पुणे पोलीस
Pune Police

जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक - ६०     दिनांक - २३/०१/२०२४**

## गुन्हे शाखा युनिट- ०६,पुणे शहर

## जबरी चोरी करणारा अट्टल गुन्हेगार जेरबंद,त्याचेकडुन जबरी चोरीचे ०४ गुन्हे उघड

दि.२२/०१/२०२४ रोजी गुन्हे शाखा युनिट-६ कडील पथक युनिट हद्दीत गुन्हे प्रतिबंधात्मक व गुन्हेगार चेकिंग पेट्रोलिंग करित असताना,युनिटकडील पोलीस अंमलदार,ताकवणे यांना बातमी मिळाली की,भैरवनाथ तलावा जवळ मोकळे मैदानात एक ग्रे रंगाची इर्टिगा गाडी संशयास्पदरित्या थांबलेली आहे. सदरची बातमी मा.वरिष्ठांना कळवुन,युनिटकडील पोलीस पथक गाडी जवळ जाताच त्यातील इसम गाडी सोडुन पळुन जात असताना,लागलीच युनिटकडील पोलीस पथकाने पाठलाग करुन त्यास पकडुन,त्यास त्याचे नाव पत्ता विचारता त्याने त्याचे नाव **राजन गोपाल नायर,वय-३३ वर्षे,रा.मु.पो.न्यू कोपरे रोड,उत्तमनगर,ता.हवेली,जि.पुणे** असे असल्याचे सांगितले. त्याची हालचाल संशयास्पद वाटून तो काहीतरी लपवित असल्याचे लक्षात आल्याने,सदर इसमाची व त्याचे ताब्यात असलेल्या इर्टिगा गाडीची झडती घेतली असता,त्याचे ताब्यात विविध कंपनीचे एकुण ०४ मोबाईल हँडसेट व एक पॅनासोनिक कंपनीचा कॅमेरा मिळुन आले. सदर मोबाईल व कॅमेराबाबत त्याचेकडे तपास केला असता त्याने वेग-वेगळया ठिकाणावरुन चोरी केले असल्याचे सांगितले. सदर मोबाईल व कॅमेरा बाबत पोलीस स्टेशनकडील अभिलेख तपासला असता,त्याचेविरूध्द १)विश्रामबाग पोस्टे गु.र.नं.०९/२०२४ भा.द.वि.३९२,३४ २) सिंहगड रोड पो.स्टे गु.र.नं. ४४/२०२४,भा.द.वि.क.३९२,३४ ३)फरासखाना पो.स्टे १६/२०२४ भादवि ३९२,३४ ४)लोणीकंद ६३/२०२४,भादवि ३९२ प्रमाणे गुन्हे दाखल असल्याचे निष्पन्न झाले आहे. त्याचेकडुन गुन्हयात चोरी केलेले मोबाईल,कॅमेरा व गुन्हा करते वेळी वापरलेली कार असा एकुण ८,३५,०००/- रु किंचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

नमुद आरोपीविरुद्ध यापुर्वी कोथरुड,वारजे-माळवाडी, उत्तमनगर, कोंढवा, फरासखाना, डेक्कन, कोरेगाव-पार्क, लोणीकंद इत्यादी पोलीस स्टेशन येथे एकुण २१ जबरी चोरी,दरोडा इत्यादी गुन्हे दाखल असुन,त्याचेवर फरासखाना पो स्टे येथे सन २०१८ मध्ये मकोका कायद्या अंतर्गत कारवाई करण्यात आली होती.

सदरची कामगिरी मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.रितेश कुमार, मा.सह पोलीस आयुक्त, पुणे शहर,श्री.रामनाथ पोकळे, मा.पोलीस उपआयुक्त,गुन्हे,श्री.अमोल झेंडे, मा.सहा.पोलीस आयुक्त,गुन्हे-२,श्री.सतिश गोवेकर यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा,युनिट-६ चे पोलीस निरीक्षक, श्री.उल्हास कदम, पोलीस अंमलदार,विठ्ठल खेडकर, बाळासाहेब सकटे, रमेश मेमाणे, नितीन मुंढे, प्रतिक लाहीगुडे, कानिफनाथ कारखेले, ऋषिकेश ताकवणे, सचिन पवार, ऋषिकेश व्यवहारे, नितीन धाडगे, महेंद्र कडु, ज्योती काळे व सुहास तांबेकर यांनी केली.